Filed on 29 DEC 2014

Superintendent
Civil Court, Sr. Dn., Pune

पुणे येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर पुणे यांचे न्यायालयात

नियमित दिवाणी मुकादमा नंबर : ५ /२०१५

१) श्री. चंद्रकांत सोनबा मोहिते,
वय : ५६ वर्षे, धंदा: शेती

२) श्री. विष्णू सोनबा मोहिते,
वय : ५४ वर्षे, धंदा: शेती

३) श्री. हरिश्चंद्र सोनबा मोहिते,
वय : ५० वर्षे, धंदा: शेती

४) श्री. गजानन सोनबा मोहिते,
वय : ४८वर्षे धंदा: शेती.

५) सौ. मंदा रामदास मोहिते,
वय : ५५ वर्षे, धंदा: गृहिणी

सर्व रा. एवॉन बिल्डींग, सर्व्हे नं. ३१/२अ/२,
धनकुडे वस्ती बाणेर पुणे ... वादी

विरुद्ध

१) मे. करण ग्रुप डेव्हलपमेंन्ट कार्पोरेशन
भागीदारी कायद्याप्रमाणे नोंदणीकृत भागीदारी संस्था
कार्यालयीन पत्ता : ४था मजला बोनीटा, सि. टी. एस ११८७/१६
प्लॉट नं. ५४१/१५, घोले रोड, शिवाजीनगर पुणे : ४११ ००५
तर्फे भागीदार श्री. दिपक विलासराव जगताप
रा. वरील प्रमाणे

२) मे. मैत्रये डेव्हलपर्स,
कार्यालयीन पत्ता : निर्मिती इमीनन्स,
एरंडवणा , पुणे : ४११ ००४
तर्फे
अधिकृत प्रधिनिधी
१) सुनिल रामचंद्र पुराणिक'
२) समीर शरदचंद्र बेलवलकर

... प्रतिवादी

दावा :ठराव व ताकीदीच्या निरंतर मनाईकामी

स्थलसिमेकरीता दाव्याचे मुल्यांकन :

न्यायालयीन शुल्काकामी दाव्याचे मुल्यांकन :

न्यायालयीन शुल्क जमा :

वादी तर्फे थराव व ताकीदीच्या निरंतर मनाईकामी दावा दाखल करण्यात येतो तो येणेप्रमाणे :

१) मिळकतीचे वर्णन : तुकडी पुणे पोट तुकडी तालुका हवेली, मे. सब-रजिस्ट्रार साहेब हवेली, यांचे हद्दीतील गांव मौजे बाणेर, येथील शेतजमिनी खालीलप्रमाणे ;

अ) सर्व्हे नं. ३१/२अ/२, क्षेत्र ० हे. ६७ आर, आकार रक्कम रुपये ० पैसे ६२, यांसी चतु:सीमा खालीलप्रमाणे :

पूर्वेस :वहिवाटीचा २० फुट रस्ता व ताराबाई ढुमणे व इतर यांची मिळकत (सर्वे नं ३०)

पश्चिमेस :सौ. ताराबाई ढुमणे यांची जमिन सर्व्हे नं. ३१/२अ/१

दक्षिणेस : याच सर्व्हे नंबर मधील सबरवाल वगैरे यांना विकलेली मिळकत क्षेत्र ११२ आर

उत्तरेस : सुस- बाणेर रस्ता.

ब) स.क्र. ३०/१ पैकी क्षेत्र ०हे. ७६.४ आर आकार रुपये ० पैसे ८७ यांसी चतु:सीमाखालील प्रमाणे :

पूर्वेस :स. नं. २१ व २२ मधील मारुती धनकुडे व रामभाऊ धनकुडे वगैरे यांची जमीन

पश्चिमेस : स.क्र. ३१ पैकी श्री मोहिते व सबरवाल यांची मिळकत

दक्षिणेस : स. नं. १९ मधील धनकुडे यांची मिळकत

उत्तरेस : याच स. नं. ३०/१ मधील क्षेत्र अंदाजे ४३.७ आर इ. ढुमणे व तापकीर

वरील नमुद दोन्ही मिळकतीमधील वहीवाटीचा ३० फुट रस्ता (हा दाव्यासोबत जोडलेल्या नकाशात लाल रंगाने दर्शविण्यात आलेला आहे सदर नकाशास दाव्याचा भाग समजण्यात यावे) हा दाव्याचा विषय असुन याचा उल्लेख यापुढे सदर रस्ता असा केलेला आहे.

२) वादी कळवितात की, मौजे बाणेर ता. हवेली जिल्हा पुणे येथील सर्व्हे नं. ३१/२अ/२ व सर्व्हे नं. ३०/१ या दोन्ही मिळकतींच्या बांधावर ३० फुटी रस्ता हा या दाव्याचा विषय असून सर्व्हे नं. ३१/२अ/२ ही मिळकत वादींची मालकी व वहिवाटीची मिळकत होती. सदर मिळकत वादींनी विकसनास दिलेली असून सदर मिळकतीचे विकसन पूर्ण होवून सदर मिळकतीत इमारत तयार झालेल्या असून विविध सदनिका धारक सदर मिळकतीचा उपभोग घेत आहेत. सर्व्हे नं. ३०/१ ही मिळकत पूर्वी पांडुरंग भुजबळ यांची मिळकत होती. पांडुरंग भुजबळ यांचे वारस ज्ञानोबा पांडुरंग भुजबळ, यांनी सर्व्हे नं. ३०/१ व सर्व्हे नं. ३१/२/२ यांचे मधून जाणा-या २० फुटी रस्त्याबाबत वादीसोबत करार केलेला असून त्या आधारे सर्व्हे नंबर ३०/१ व सर्व्हे नं. ३१/२/२ या दोन्ही मिळकतीमध्ये सोयीस्करपणे जाता यावे म्हणून दक्षिणोत्तर २० फुटी रस्ता उपलब्ध व्हावा म्हणून सदरचा करार दिनांक ८/४/१९९४ रोजी वादी व श्री. ज्ञानोबा पांडुरंग भुजबळ यांचेमध्ये करण्यात आलेला होता.

३) वादी कळवितात की सदर २० फूटी रस्त्याकरीता १० फूट रुंद व १९० मीटर लांबीची जागा ही भुजबळ यांनी सोडलेली असून १० फूट रुंद व १९० मीटर लांबीची जागा वादींनी सोडलेली असून फक्त सर्व्हे नं. ३१ व ३० याच मिळकतींच्या धारकांना सदर रस्त्याचा उपभोग घेता यावा हा सदर करारामागील हेतू होता. त्यानंतर २००७ साली पुन्हा दोन्ही मिळकतिच्या मालकांनी प्रत्येकी ५ फुट जागा सोडुन सदरचा रस्ता तीस फुटी झालेला आहे.

४) वादी कळवितात की प्रतिवादी नं २ यांनी सर्व्हे नंबर ३० मधील क्षेत्र विकसीत केलेले असून प्रतिवादी नंबर १ यांनी सर्व्हे नंबर २७ मधील क्षेत्र विकसनाकामी घेतलेले आहे. प्रतिवादी नं. २ यांनी वादी व श्री भुजबळ यांचेमध्ये दिनांक ८/४/१९९४ रोजी झालेल्या करारातील अटींचा भंग करुन सदर २० फूटी रस्त्यास, सर्व्हे नं. २७/१ मध्ये जाण्याकरीता सर्व्हे नंबर ३० मधून रस्त्याकरीता मिळकत उपलब्ध करुन दिलेली असून त्याचे मोबदल्यात सर्व्हे नं. २७/१ मधील क्षेत्र अदलाबदल करुन घेतलेले आहे. मुलत: प्रतिवादी नं. २ यांना त्यांचे मिळकती करीता रस्त्याचा वापर करण्याचा अधिकार होता व आहे. परंतु दुस-या मिळकतीकरीता सदर ३० फुटी रस्त्याचा वापर प्रतिवादी नं. १ यांना करण्याचा अधिकार देण्याचा काही एक अधिकार प्रतिवादी नं. २ यांना नव्हता व नाही. प्रतिवादी नं. १ व २ यांनी आपापल्या कराराची २६ फेब्रुवारी २००८ रोजी केलेला असून

प्रतिवादी क्र. २ यांनी प्रतिवादी क्र. १ यांना दक्षिण बाजुकडून १ मीटर रस्ता दिलेला असून तो दाव्यासोबत जोडलेल्या नकाशात (पिवळ्या रंगाने दर्शविण्यात आलेला आहे.) त्यामुळे प्रतिवादी नं. १ व २ यांचेदरम्यान झालेला करार वादीवर बंधनकारक नाही.

५) वादी कळवितात की सदर रत्याकामी दिलेली परवानगी बेकायदेशीर असून वादींचा हक्कभंग करणारी आहे. वास्तविक पाहता सदर रस्ता हा सार्वजनिक नाही. सदर रस्ता हा भुजबळ व मोहिते यांच्या खाजगी मालकीचा होता. परंतु भुजबळांनी प्रतिवादी नं. २ यांना विकसनाकरीता मिळकत दिल्याने सदर रस्त्याची मालक प्रतिवादी नं. २ व वादी हे बनले त्यामुळे सर्व्हे नं. ३० व ३१ शिवाय सदर रस्त्याचे अधिकार देण्याविषयीची तरतूद सदर दिनांक ८/४/१९९४ रोजीच्या करारात नव्हती व नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. २ यांना ३० फुट रस्त्यापासून सर्व्हे नं. २७ कडे जाण्यायेण्याकामी व ३० फुटी रस्त्याच्या वापराकामी परवानगी देण्याचा अधिकार नव्हता व नाही. त्यामुळे सर्व्हे नं. २७ मधील हक्कदारांना सदर दाव्याचा विषय असलेल्या रस्त्याचा वापर करावयाचा अधिकार नाही. प्रतिवादी नं. १ यांनी सर्व्हे नं. २७/१ मध्ये मोठी योजना केलेली असून सदर योजनेद्वारे १00 पेक्षा जास्त सदनिकांची निर्मिती करीत असून भविष्यात सर्व सदनिक धारक २० फुटी खाजगी रस्त्याचा वापर करणार आहेत. सदरची बाब पूर्णतः बेकायदेशीर असून श्री. भुजबळ व वादी यांचे दरम्यान झालेल्या कराराप्रमाणे सदरचा रस्ता हा फक्त सर्व्हे नं. ३० व ३१ मधील धारकांसाठी असून प्रतिवादी नं. १ यांना सदर रस्त्याबाबत काही एक हक्क अधिकार नाही. भविष्यात प्रतिवादी नं. १ यांची योजना संपुर्ण झाल्यानंतर व योजनेतील सदनिकांमध्ये सदनिका धारक राहण्याकरीता आल्यानंतर सदर खाजगी रस्त्यावरील वाहतूक व आवक जावक निष्कारण वाढणार असून त्याचा त्रास हा वादी व सर्व्हे नं. ३१ मधील मिळकतींच्या धारकांना होणार आहे. सदर सर्व्हे नं. २७ मध्ये प्रतिवादींनी योजना मंजुर करुन घेतल्यानंतर बांधकामकामी ट्रक, कन्टेनर, मिक्सर ही वाहने सदर सदरची वाहने भरधाव रस्त्यावरुन जात असून सर्व्हे नं. ३१ मधील योजनेमध्ये रहिवासास असलेल्या रहिवाशांच्या व त्यांचे लहान मुलांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण झालेला असून जिवित हानी होण्याचा संभव आहे. त्यामुळे परिसरातील शांतता धोक्यात आलेली आहे.

६) वादी कळवितात की वास्तविक पाहता करारनामा हा दोन सर्व्हे नं. ३० व ३१ करीता असताना सर्व्हे नं. २७/१ मध्ये चालू असलेल्या

बांधकामाकरीता चालू असलेली रहदारी व त्यानंतर १०० कुटुंब सदर जागेत वसल्यानंतर होणारी रहदारी ही वस्तवापासून भयानक असून त्याचा त्रास हा सर्व्हे नंबर ३१ मधील रहिवाशी असलेल्या वादींना भोगावा लागणार आहे. त्यामुळे वादी यांनी दिनांक १८/१०/२०१४ रोजी प्रतिवादीपैकी नं. १ व २ यांचे विक्रीदार, प्रतिनिधी, नोकर चाकर इ. यांनी बाणेर सुस रस्त्यापासून सुरवात झालेल्या व सर्व्हे नं. ३० व ३१ च्या बांधावर असलेल्या २० फुटी रस्त्याचा वापर त्वरीत बंद करावा व सदर रस्त्यावरुन प्रतिवादीपैकी नं. १ व २ यांचे कामाकरीता चालू असलेली वाहतूक व वर्दळ तात्काळ बंद करावी. अन्यथा वादी योग्य ती कायदेशीर कारवाई करतील या आशयाचे नोटीस प्रतिवादींना पाठविण्यात आलेली होती. परंतु प्रतिवादी यांनी हेतुपुरस्सरपणे सदर नोटीसकडे दुर्लक्ष करुन नोटीसीस उत्तर दिले नाही. त्यामुळे वादी यांनी दिनांक १५/११/२०१४ रोजी प्रतिवादींची समक्ष भेट घेतली असता प्रतिवादींनी तुम्हांला कोणती कायदेशीर कारवाई करायची असेल ती करा आम्ही कोणत्याही कायदेशीर कारवाईस घाबरत नाही. अशा आशयाचे उत्तर दिले त्यामुळे नाईलाजास्तव वादी यांना सदरचा दावा प्रतिवादी यांचे विरुध्द मनाई मिळणेकामी दाखल करावा लागत आहे. प्रतिवादी क्र. २ यांनी वादी यांचे संमतीशिवाय रस्त्याच्या वापरास परवानगी प्रतिवादी क्र. १ यांना दिल्याने त्यांना पक्ष म्हणून समाविष्ट करण्यात आलेला आहे.

७) <u>दाव्यास कारण</u> : दाव्यास कारण प्रथम प्रतिवादी यांनी दिनांक २६/०२/२००८ रोजी प्रतीवादी यांचा करार होवुन प्रतीवादी यांनी सदर रस्त्याचा वापर करण्यास सुरुवात केली त्यावेळी घडले, त्यानंतर दि. १८/१०/२०१४ रोजी वादी यांनी प्रतीवादींना नोटीस दिली त्यावेळी घडले त्यानंतर वादी यांनी दिनांक १५/११/२०१४ रोजी प्रतिवादींची समक्ष भेट घेतली असता प्रतिवादींनी तुम्हांला कोणती कायदेशीर कारवाई करायची असेल ती करा मी कोणत्याही कायदेशीर कारवाईस घाबरत नाही. अशा आशयाचे उत्तर दिले त्यावेळी घडले वादींनी हरकत घेवूननही प्रतीवादींनी सदर रस्त्याचा वापर बंद केला नाही म्हणुन आजतागायत घडत आहे.

८) <u>कार्यक्षेत्र</u> : वादी व प्रतिवादी हे मे. न्यायालयाचे कार्यक्षेत्रात रहिवासास असून दावा मिळकत ही मे. न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात वसलेली

आहे. त्यामुळे सदरचा दावा चालविणेचा तसेच निकाली काढण्याचा अधिकार मे. न्यायालयास आहे.

९) **<u>मुल्यांकन</u>** :- सदरचा दावा निरंतर मनाईकामी दाखल केलेला असल्याने सदर दाव्याचे मुल्यांकन मुंबई न्यायालयीन मुद्रांक शुल्क अधिनियम च्या कलम ६ (५) जे प्रमाणे रक्कम रुपये --- इतके केलेले असुन त्यावर योग्य ते न्यायालयीन शुल्क रक्कन रुपये ---- भरण्यात आलेले आहे.

<u>तरी विनंती की,</u>

१) वादी यांचा दावा मंजुर करण्यात यावा .

२) प्रतिवादीपैकी नं. १ त्यांचे सर्व्हे नं. २७ मधील विक्रीदार, प्रतिनिधी, नोकर चाकर इ. यांनी सदर दावा मिळकत ३० फुटी रस्त्याचा वापर करु नये म्हणुन प्रतीवादी यांचेविरुद्ध निरंतर मनाई हुकुम देण्यात यावा

३) दावा प्रलंबित असेपर्यंत प्रतिवादीपैकी नं. १ त्यांचे सर्व्हे नं. २७ मधील ३० फुटी विक्रीदार, प्रतिनिधी, नोकर चाकर इ. यांनी सदर दावा मिळकत रस्त्याचा वापर करु नये म्हणुन प्रतीवादी यांचेविरुद्ध म्हणून तात्पुरता मनाई हुकुम प्रतिवादी यांचे विरुध्द देण्यात यावा.

४) इतर योग्य व न्याय्य हुकुम जो वादी यांच्या बाजुने असेल तो करण्यात यावा.

ठिकाण : पुणे

दिनांक २५/१२/२०१८

वादी

१) श्री. चंद्रकांत सोनबा मोहिते,

२) श्री. विष्णू सोनबा मोहिते,

३) श्री. हरिश्चंद्र सोनबा मोहिते,

G.S.Mohite

४) श्री. गजानन सोनबा मोहिते

मंदा रामदास मोहिते

५) सौ. मंदा रामदास मोहिते,

वादीके तर्फे वकील

प्रतिज्ञालेख

आम्ही वरील नमूद वादी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की वरील दाव्यातील नमूद मजकूर अमचे माहिती व ज्ञानाप्रमाणे खरा व बरोबर असून तो आम्हांला मान्य असल्याने त्यावर आम्ही आमच्या स्वाक्ष-या केल्या आहेत.

ठिकाण : पुणे.

दिनांक : २५/१२/२०१८

वादी

१) श्री. चंद्रकांत सोनबा मोहिते,

V.S. Mohite

२) श्री. विष्णू सोनबा मोहिते,

३) श्री. हरिश्चंद्र सोनबा मोहिते,

G.S.Mohite

४) श्री. गजानन सोनबा मोहिते

मंदा रामदास मोहिते

५) सौ. मंदा रामदास मोहिते,


Google
Image © 2013 DigitalGlobe

पुणे येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर पुणे यांचे न्यायालयात

स्पे. मुकद्दमा नंबर : ९ /२०१४

१) श्री. चंद्रकांत सोनबा मोहिते,
व ईतर ... वादी

विरुद्ध

१) मे. करण ग्रुप डेव्हलपमेन्ट कार्पोरेशन
व ईतर

... प्रतिवादी

<u>तात्पुरता मनाई हुकुम मिळणेकामी</u>

वादी हे तात्पुरता मनाई हुकुम मिळणेकामी नम्रपणे विनंती करतात ती येणेप्रमाणे :

१) वादी यांनी सदरचा दावा निरंतर मनाईकामी दाखल दाखल केलेला असून सदर दाव्याचा मजकूर हा या अर्जाचा भाग समजण्यात यावा. प्रक्रीयेत सदरचा मजकूर पुन्हा पुन्हा येवू नये म्हणून या अर्जात सदरचा मजकूर नमुद करण्यात आलेला नाही.

२) वादी कळवितात की, मौजे बाणेर ता. हवेली जिल्हा पुणे येथील सर्व्हे नं. ३१/२अ/२ व सर्व्हे नं. ३०/१ या दोन्ही मिळकतींच्या बांधावर २० फुटी रस्ता हा या दाव्याचा विषय असून सर्व्हे नं. ३१/२अ/२ ही मिळकत वादींची मालकी व वहिवाटीची मिळकत होती. सदर मिळकत वादींनी विकसनास दिलेली असून सदर मिळकतीचे विकसन पूर्ण होवून सदर मिळकतीत इमारत तयार झालेल्या असून विविध सदनिका धारक सदर मिळकतीचा उपभोग घेत आहेत. सर्व्हे नं. ३०/१ ही मिळकत पूर्वी पांडुरंग भुजबळ यांची मिळकत होती. पांडुरंग भुजबळ यांचे वारस ज्ञानोबा पांडुरंग भुजबळ, यांनी सर्व्हे नं. ३०/१ व सर्व्हे नं. ३१/२/२ यांचे मधून जाणा-या २० फुटी रस्त्याबाबत वादींसोबत करार केलेला असून त्या आधारे सर्व्हे नंबर ३०/१ व सर्व्हे नं. ३१/२/२ या दोन्ही मिळकतींमध्ये सोयीस्करपणे जाता यावे म्हणून दक्षिणोत्तर २० फुटी रस्ता उपलब्ध व्हावा म्हणून सदरचा करार दिनांक ८/४/१९९४ रोजी वादी व श्री. ज्ञानोबा पांडुरंग भुजबळ यांचेमध्ये करण्यात आलेला होता.

३) वादी कळवितात की सदर २० फूटी रस्त्याकरीता १० फूट रुंद व १९० मीटर लांबीची जागा ही भुजबळ यांनी सोडलेली असून १० फूट रुंद व १९० मीटर लांबीची जागा वादींनी सोडलेली असून फक्त सर्व्हे नं. ३१ व ३० याच मिळकतींच्या धारकांना सदर रस्त्याचा उपभोग घेता यावा हा सदर करारामागील हेतू होता. त्यानंतर २००७ साली पुन्हा दोन्ही मिळकतिच्या मालकांनी प्रत्येकी ५ फुट जागा सोडुन सदरचा रस्ता तीस फुटी झालेला आहे.

४) वादी कळवितात की प्रतिवादी नं २ यांनी सर्व्हे नंबर ३० मधील क्षेत्र विकसीत केलेले असून प्रतिवादी नंबर १ यांनी सर्व्हे नंबर २७ मधील क्षेत्र विकसनाकामी घेतलेले आहे. प्रतिवादी नं. २ यांनी वादी व श्री भुजबळ यांचेमध्ये दिनांक ८/४/१९९६ रोजी झालेल्या करारातील अटींचा भंग करुन सदर २० फूटी रस्त्यास, सर्व्हे नं. २७/१ मध्ये जाण्याकरीता सर्व्हे नंबर ३० मधून रस्त्याकरीता मिळकत उपलब्ध करुन दिलेली असून त्याचे मोबदल्यात सर्व्हे नं. २७/१ मधील क्षेत्र अदलाबदल करुन घेतलेले आहे. मुलत: प्रतिवादी नं. २ यांना त्यांचे मिळकती करीता रस्त्याचा वापर करण्याचा अधिकार होता व आहे परंतु दुस-या मिळकतीकरीता सदर ३० फुटी रस्त्याचा वापर प्रतिवादी नं. १ यांना करण्याचा अधिकार देण्याचा काही एक अधिकार प्रतिवादी नं. २ यांना नव्हता व नाही. प्रतिवादी नं. १ व २ यांनी आपापल्या कराराची २६ फेब्रुवारी २००८ रोजी केलेला असून प्रतिवादी क्र. २ यांनी प्रतिवादी क्र. १ यांना दक्षिण बाजुकडून ९ मीटर रस्ता दिलेला असून तो दाव्यासोबत जोडलेल्या नकाशात (पिवळ्या रंगाने दर्शविण्यात आलेला आहे.) त्यामुळे प्रतिवादी नं. १ व २ यांचेदरम्यान झालेला करार वादीवर बंधनकारक नाही.

५) वादी कळवितात कि सदर रत्याकामी दिलेली परवानगी बेकायदेशीर असून वादींचा हक्कभंग करणारी आहे. वास्तविक पाहता सदर रस्ता हा सार्वजनिक नाही. सदर रस्ता हा भुजबळ व मोहिते यांच्या खाजगी मालकीचा होता. परंतु भुजबळांनी प्रतिवादी नं. २ यांना विकसनाकरीता मिळकत दिल्याने सदर रस्त्याची मालक प्रतिवादी नं. २ व वादी हे बनले त्यामुळे सर्व्हे नं. ३० व ३१ शिवाय सदर रस्त्याचे अधिकार देण्याविषयीची तरतूद सदर दिनांक ८/४/१९९४ रोजीच्या करारात नव्हती व नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. २ यांना ३० फुट रस्त्यापासून सर्व्हे नं. २७ कडे जाण्यायेण्याकामी व ३० फुटी रस्त्याच्या वापराकामी परवानगी देण्याचा अधिकार नव्हता व नाही. त्यामुळे सर्व्हे नं. २७ मधील हक्कदारांना सदर

दाव्याचा विषय असलेल्या रस्त्याचा वापर करावयाचा अधिकार नाही. प्रतिवादी नं. १ यांनी सर्व्हे नं. २७/१ मध्ये मोठी योजना केलेली असून सदर योजनेद्वारे १०० पेक्षा जास्त सदनिकांची निर्मिती करीत असून भविष्यात सर्व सदनिका धारक २० फुटी खाजगी रस्त्याचा वापर करणार आहेत. सदरची बाब पूर्णत: बेकायदेशीर असून श्री. भुजबळ व वादी यांचे दरम्यान झालेल्या कराराप्रमाणे सदरचा रस्ता हा फक्त सर्व्हे नं. ३० व ३१ मधील धारकांसाठी असून प्रतिवादी नं. १ यांना सदर रस्त्याबाबत काही एक हक्क अधिकार नाही. भविष्यात प्रतिवादी नं. १ यांची योजना संपुर्ण झाल्यानंतर व योजनेतील सदनिकांमध्ये सदनिका धारक राहण्याकरीता आल्यानंतर सदर खाजगी रस्त्यावरील वाहतूक व आवक जावक निष्कारण वाढणार असून त्याचा त्रास हा वादी व सर्व्हे नं. ३१ मधील मिळकतींच्या धारकांना होणार आहे. सदर सर्व्हे नं. २७ मध्ये प्रतिवादींनी योजना मंजुर करुन घेतल्यानंतर बांधकामकामी ट्रक, कन्टेनर, मिक्सर ही वाहने सदर सदरची वाहने भरधाव रस्त्यावरुन जात असून सर्व्हे नं. ३१ मधील योजनेमध्ये रहिवासास असलेल्या रहिवाशांच्या व त्यांचे लहान मुलांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण झालेला असून जिवित हानी होण्याचा संभव आहे. त्यामुळे परिसरातील शांतता धोक्यात आलेली आहे.

६) वादी कळवितात की वास्तविक पाहता करारनामा हा दोन सर्व्हे नं. ३० व ३१ करीता असताना सर्व्हे नं. २७/१ मध्ये चालू असलेल्या बांधकामाकरीता चालू असलेली रहदारी व त्यानंतर १०० कुटुंब सदर जागेत वसल्यानंतर होणारी रहदारी ही वास्तवापासून भयानक असून त्याचा त्रास हा सर्व्हे नंबर ३१ मधील रहिवाशी असलेल्या वादींना भोगावा लागणार आहे. त्यामुळे वादी यांनी दिनांक १८/१०/२०१४ रोजी प्रतिवादीपैकी नं. १ व २ यांचे विक्रीदार, प्रतिनिधी, नोकर चाकर इ. यांनी बाणेर सुस रस्त्यापासून सुरवात झालेल्या व सर्व्हे नं. ३० व ३१ च्या बांधावर असलेल्या २० फुटी रस्त्याचा वापर त्वरीत बंद करावा व सदर रस्त्यावरुन प्रतिवादीपैकी नं. १ व २ यांचे कामाकरीता चालू असलेली वाहतूक व वर्दळ तात्काळ बंद करावी. अन्यथा वादी योग्य ती कायदेशीर कारवाई करतील या आशयाचे नोटीस प्रतिवादींना पाठविण्यात आलेली होती. परंतु प्रतिवादी यांनी हेतुपुरस्सरपणे सदर नोटीसकडे दुर्लक्ष करुन नोटीसीस उत्तर दिले नाही. त्यामुळे वादी यांनी दिनांक १७/११/२०१४ रोजी प्रतिवादींची समक्ष भेट घेतली असता प्रतिवादींनी तुम्हांला कोणती कायदेशीर कारवाई करायची असेल ती करा आम्ही कोणत्याही कायदेशीर कारवाईस घाबरत नाही. अशा

आशयाचे उत्तर दिले त्यामुळे नाईलाजास्तव वादी यांना सदरचा दावा प्रतिवादी यांचे विरुध्द मनाई मिळणेकामी दाखल करावा लागत आहे. प्रतीवादी क्र. १, त्यांचे खरेदीदार , नोकर चाकर , प्रतीनिधी यांनी दाव्याचा निकाल लागेपर्यंत सदर रस्त्याचा वापर करु नये म्हणुन वादी यांनी सदरचा अर्ज तात्पुरती मनाई मिळणेकामी दाखल केलेला आहे.

७) प्रथमदर्शनी प्रकरण वादी यांच्या हक्कात असून न्यायाचा तराजू वादी यांचे बाजूने झुकलेला आहे. सदर प्रतीवादी क्र. १, त्यांचे खरेदीदार , नोकर चाकर , प्रतीनिधी यांनी दाव्याचा निकाल लागेपर्यंत सदर रस्त्याचा वापर करु नये म्हणून त्यांचे विरुध्द मनाई हुकुम देण्यात येणे आवश्यक आहे. सबब प्रतिवादींविरुध्द आदेश करण्यात आला नाही तर वादी यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करण्यात येणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे.

<u>तरी विनंती की,</u>

१) वादी यांचा अर्ज मंजुर करण्यात यावा .

२) दाव्याचा निकाल अंतीम गुणदोषावर लागेपर्यंत प्रतिवादीपैकी नं. १ त्यांचे सर्व्हे नं. २७ मधील विक्रीदार, प्रतिनिधी, नोकर चाकर इ. यांनी सदर दावा मिळकत ३० फुटी रस्त्याचा वापर करु नये म्हणुन प्रतीवादी यांचेविरुद्ध तात्पुरता मनाईहुकुम देण्यात यावा

३) सदर्चा प्रलंबित असेपर्यंत प्रतिवादीपैकी नं. १ त्यांचे सर्व्हे नं. २७ मधील ३० फुटी विक्रीदार, प्रतिनिधी, नोकर चाकर इ. यांनी सदर दावा मिळकत रस्त्याचा वापर करु नये म्हणुन प्रतीवादी यांचेविरुद्ध म्हणून एकतर्फा तात्पुरता मनाई हुकुम प्रतिवादी यांचे विरुध्द देण्यात यावा.

४) इतर योग्य व न्याय्य हुकुम जो वादी यांच्या बाजुने असेल तो करण्यात यावा.

ठिकाण : पुणे.

दिनांक : २०/१२/२०१८

वादी

१) श्री. चंद्रकांत सोनबा मोहिते,

२) श्री. विष्णू सोनबा मोहिते,

३) श्री. हरिश्चंद्र सोनबा मोहिते,

४) श्री. गजानन सोनबा मोहिते

५) सौ. मंदा रामदास मोहिते,

प्रतिज्ञालेख

आम्ही वरील नमूद वादी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की वरील दाव्यातील नमूद मजकूर आमचे माहिती व ज्ञानाप्रमाणे खरा व बरोबर असून तो आम्हांला मान्य असल्याने त्यावर आम्ही आमच्या स्वाक्ष-या केल्या आहेत.

ठिकाण : पुणे

दिनांक : २९/१२/२०१४

वादी

१) श्री. चंद्रकांत सोनबा मोहिते,

२) श्री. विष्णू सोनबा मोहिते,

३) श्री. हरिश्चंद्र सोनबा मोहिते,

४) श्री. गजानन सोनबा मोहिते

५) सौ. मंदा रामदास मोहिते,

पुणे येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर पुणे यांचे न्यायालयात.
रे.दि.मु.नं ५/२०१५

श्री. चंद्रकांत सोनबा मोहिते ---- वादी

विरुद्ध

मे. करण ग्रुप डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन स्तर ------ प्रतिवादी.

वादी यांचे तर्फे दाखल कागदपत्रांची यादी

पुढील प्रमाणे.

अनु. क्र.	कागदपत्रांचा तपशील	दिनांक	शेरा.
१.	करारनामा (दि. २६ फेब्रुवारी २००८)	२६/२/०८	झेरॉक्स
२.	करारनामा बाबत साक्षी डिक्लेर ... साक्षी व वारसदारांसाठी	८.४.१९९४	-//-
३.	मु.कृ. ... चा उतारा.	२०१३/१४	-//-
४.	पुणे महानगरपालिकेने प्रस्तावित आराखड्यानुसार तयार करण्यात आलेल्या स.नं ३७, ३०, ३९ ची प्रत.		फोटोप्रत
५.	गुलाम अर्थ वजन काढलेल्या नकाशाची प्रत.१		फोटोप्रत
६.	गुलाम अर्थ वजन काढलेल्या नकाशाची प्रत.२.		फोटोप्रत.

एकूण दाखल कागदपत्रे = ६

वादीतर्फे ॲडव्होकेट.

दिनांक: २५१२१२०१४
ठिकाण: पुणे